**महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था येथे विविध औषधी तसेच फुल झाडांचे प्रदर्शन**

**प्राधिकरणाचे समग्र प्रदर्शनाचे पहिलेच वर्ष**

**निसर्ग संवर्धनाबाबत जनजागृतीसाठी एमएमआरडीएचा अभिनव उपक्रम**

**मुंबई, २४ फेब्रुवारी, २०२३:**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण संचालित महाराष्ट्र निसर्ग उद्यान येथे आयोजित करण्यात आलेल्या ३ दिवसीय प्रदर्शनाचे मा. महानगर आयुक्त श्री एस. व्ही. आर. श्रीनिवास भा. प्र.से. यांच्या हस्ते उद्घाटन करून ते मुंबईकरांसाठी खुले करण्यात आले. प्रदर्शनाचे हे पहिलेच वर्ष असून, हे प्रदर्शन मुंबईकरांसाठी विनामूल्य असणार आहे. कुंड्यांमध्ये वाढविलेली फळझाडे व फुलझाडे, फळभाज्यांची झाडे, मोसमी फुलझाडे, औषधी वनस्पती, बोनसाय तसेच कृष्णवडासारख्या अनेक दुर्मिळ देशी प्रजातींची झाडे देखील यंदाच्या प्रदर्शनात 'याची देही, याची डोळा' बघता येणार आहेत.

कुंड्यामध्ये वाढलेल्या फळभाज्या पालेभाज्या व विदेशी वनस्पती, फळझाडे, हंगामी फुलझाडे, शोभिवंत पानाची झाडे, सुगंधी व औषधी वनस्पती, गुलाबाची रोपे यांचे शेकडो प्रकार मुंबईकरांना या प्रदर्शनात पहायला मिळणार आहेत, तसेच मुंबई बटुवृक्ष (बोन्साय) या प्रजातीच्या झाडांचे देखील समावेश असणार आहे. लहान मुलांसाठी आकर्षक असे फुलांनी सजवलेलं हत्ती आणि मोर असणार आहेत. या प्रदर्शनात सनटेक, गोदरेज, हिरानंदानी, BARC, मुंबई रोझ सोसायटी, इंडियन बोन्साय सोसायटी, टाटा पॉवर, भारत डायमंड बोर्स, मुंबई महानगरपालिका, सोमय्या महाविद्यालय अशा संस्थांनी भाग घेतला आहे. या प्रदर्शनासोबतच आयोजित होणा-या विक्री दालनांमध्ये विविध प्रकारच्या झाडांची रोपे, बियाणे, खते उपलब्ध असणार आहेत.

**या प्रदर्शनातील प्रदर्शित असलेली विविध झाडं आणि रोप खालील प्रमाणे:**

· हंगामी फुलझाडांच्या ४५ प्रजाती

· कुंड्यांमध्ये वाढलेल्या शोभिवंत विभागामध्ये ४८ प्रजाती

· कुंड्यांमध्ये वाढणाऱ्या फुलझाडांच्या ५२ प्रजाती

· औषधी व सुगंधी वनस्पतींच्या ५० प्रजाती

· गुलाबाच्या २९ प्रजाती

· बोंसायच्या ३० प्रजाती

**"मुंबईच्या मीठी नदीच्या काठावर असलेल्या आणि पूर्वीच्या डम्पिंग ग्राउंड वर स्थित सुमारे ३७ एकर मध्ये पासरलेल्या महाराष्ट्र निसर्ग उद्यानात, निसर्ग संवर्धनाबाबत महत्त्व समजावून त्याबाबत जनजागृती करण्यासाठी एमएमआरडीएचा हा प्रयत्न आहे. समग्र प्रदर्शनाचे हे पहिले वर्ष असून या प्रदर्शनास नागरिकांनी आवर्जून भेट द्यावी"** अशी माहिती एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री एस. व्ही. आर. श्रीनिवास, भा. प्र.से., यांनी दिली.